# पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील : एक दीपस्तंभ

– डॉ. कैलास जगदाळे

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील आणि खेड्यापाड्यातील बहुजन समाजाची पहिली पिढी शिकली ती केवळ आणि केवळ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेमुळे. सामाजिक परिवर्तनाचे अफाट कार्य उभे करणाऱ्या कर्मवीरांनी महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा वैचारिक वारसा वृद्धिंगत केला.

ज्ञानाशिवाय मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास केवळ आणि केवळ अशक्य आहे हे त्रिकालबाधित सत्य असताना देखील भारतीय समाजव्यवस्थेत असलेल्या अत्यंत अमानवी व अन्यायकारक नियमांमुळे बहुतांश भारतीय समाज विद्येपासून पारखा झालेला होता. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने भारतीय समाज दुभंगला होता. जातीप्रथेने शोषणाच्या आणि अमानुषपणाच्या सर्व मर्यादा पार केल्या होत्या. सर्व बाजूंनी बहुजन समाजाची नाकाबंदी झाली होती. संत परंपरेने समाजव्यवस्थेला हादरे देण्यासाठी शोषणाविरुद्ध आवाज ऊठविण्याचा प्रयत्न केला खरा परंतु त्यालाही मर्यादा होत्या.

अज्ञानाची काळरात्र सरत नव्हती. ज्ञानोदयाची चिन्हे दिसत नव्हती. नवविचारांचे वारे वाहत नव्हते. एक प्रचंड मोठा वर्ग आपल्या सर्व क्षमतांवर फुलण्या–बहरण्याची बंदी घातल्यामुळे माणूस असूनही माणूसपणाला मुकला होता. अशा जबरदस्त साचलेपण आलेल्या काळात महात्मा ज्योतिबा फुले नावाचा एक बंडखोर समाजसुधारक उभा राहिला. धर्मव्यवस्थेच्या विरुद्ध विद्रोहाचा विचार मांडू लागला. ज्ञानाचे महत्त्व समाजाला सांगू लागला. या आद्य समाजसुधारकाचा विचार त्यांच्या पत्नीने, क्रांतियोती सावित्रीबाई फुले यांनी महत्प्रयासाने पुढे नेला. कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या बळकट खांद्यावर ही विचारांची पालखी विसावली. शाहूंच्या द्रष्टेपणाने प्रबोधनाचा प्रकाश सर्वत्र पसरू लागला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी हीच विचारांची पालखी पुढे घेऊन जात जातीप्रथेच्या उच्चाटनासाठी सबंध जीवन पणाला लावले.

जुन्या बुरसटलेल्या समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करून ऊठणारे सुधारक महाराष्ट्रात निर्माण झाले. काळाच्या पटलावर त्यांनी आपले कार्यकर्तृत्व सिद्धही केले, परंतु

हा विचार चिरंतन रहावा यासाठीची व्यवस्था उभी केली ती कर्मवीर भाऊराव पाटील यांनीच.

महात्मा फुले, राजर्षी शाहूंचे बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य वेगाने पुढे नेण्यासाठी मानवतेच्या बाजूने पाय रोवून उभा राहणारा वैचारिक वारसदार बहुजनांना हवा होता. कर्मवीरांच्या रूपाने तो वारसदार मिळाला. वारणेला तोरण बांधणारे कोल्हापूर जिल्ह्यातले कुंभोज हे गाव. २२ सप्टेंबर १८८७ रोजी याच गावी अण्णांचा जन्म झाला.

कोणताही सुधारक किंवा महापुरुष सहज निर्माण होत नाही. त्याच्या ठायी काही विशेष गुण असावेच लागतात. समाजाविषयीचे प्रचंड कुतूहल, रूढी परंपरांच्या पाठीमागे असणारी सत्य-असत्यता तपासण्याची दृष्टी, चिकित्सकपणा आणि व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची धमक या गुणांवरच सुधारकाचा पिंड पोसला जातो. कर्मवीर अण्णांच्या व्यक्तिमत्त्वात हे गुण बालपणापासूनच होते.

धर्माची बंधने अण्णांनी कधीच मानली नाहीत. रूढी परंपरांना 'का'? हा प्रश्न अगदी नकळत्या वयातही त्यांनी विचारला. कर्मठ जैन आचार विचारांचे पालन करण्याचा अट्टाहास त्यांनी कधी केला नाही. विवेकाला सतत जागृत ठेवून ते बालपणापासूनच वागले. जातीपाती आणि अस्पृश्यता अगदी काटेकोरपणे पाळली जाण्याचा तो काळ होता. अण्णांनी मात्र कधीही या बुरसटलेल्या प्रथा परंपरा पाळल्या नाहीत.

अण्णांचे वडील सरकारी नोकरीत असल्यामुळे सतत बदल्या ठरलेल्या असतं. विटा मुक्कामात घडलेली गोष्ट. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीतील काही मित्रांच्या बरोबर बालवयातील अण्णा खेळत होते. खेळता खेळता त्यांना तहान लागली. शेजारी असलेल्या छोट्या विहिरीवर ही सगळी मुले पाणी पिण्यासाठी गेली. परंतु विहिरीवरील लोक फक्त अण्णांना पाणी देण्यास तयार झाले. अस्पृश्यांच्या मुलांना आम्ही पाणी पिऊ देणार नाही, असे त्यांनी निक्षून सांगितले. अण्णांना या गोष्टीचा प्रचंड राग आला. ही असली अमानुष प्रथा मला मान्य नाही असे म्हणत त्यांनी त्या विहिरीचा रहाटच मोडून टाकला. अण्णांच्या आयुष्यात असे बंडखोरीचे प्रसंग आपल्याला असंख्य आढळतील. ज्ञानदेव घोलप या अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या बाबतीतही अण्णांनी बंडखोरीची भूमिका घेतली. शिक्षणासाठी कोल्हापूरला गेल्यानंतर तेथे असलेल्या जैन वसतिगृहात ते राहत होते. वसतिगृहाचे कर्मठ नियम आणि रुढी परंपरा न पाळल्यामुळे त्यांना वसतिगृहही सोडावे लागले.

वसतिगृह सुटले तरी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहूंच्या राजवाड्याने त्यांना आसरा दिला. समतेचा विचार आणि ममतेची भावना उरी असलेला हा राजा

अण्णांना आदर्श वाटला.

रूढी परंपरांचे दास बनलेल्या बहुजन समाजाच्या अवनतीचे कारण हे अज्ञान आहे याची खात्री अण्णांना पटत होती. महात्मा फुल्यांच्या तत्त्वज्ञानाकडे ते नकळतपणे आकृष्ट होत होते. पुढे अण्णा सत्यशोधक समाजाचे धडाडीचे कार्यकर्ते बनले. सत्यशोधक जलशांमध्येही त्यांनी कलावंत म्हणून काम केले. अण्णांच्या आयुष्यात उद्योग, व्यवसाय आणि नोकरी याच्या असंख्य संधी आल्या खऱ्या परंतु त्यांच्या हातून शिक्षणाचे कार्य व्हावे असे काळाला वाटत होते.

सातारा जिल्ह्यातील कराडजवळील काले या गावात भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनात १९१९ साली अण्णांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली. बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी फक्त प्रबोधन नव्हे तर शिक्षणाची आवश्यकता आहे, शिक्षण दिले की प्रबोधन आपोआप होईल असे साधे सोपे तत्त्वज्ञान या घोषणेमागे होते. काले या गावी संस्थेचे वसतिगृह स्थापन करण्यात आले. कामाचा शुभारंभ झाला. १९२४ मध्ये अण्णांनी आपल आयुष्य फक्त आणि फक्त बहुजनांच्या शिक्षणासाठी देण्याचे ठरवून पूर्णवेळ समाजसुधारणेच्या कामी स्वतःला झोकून दिले.

सुरुवातीला शिक्षणासाठी आलेल्या मुलांना त्यांनी साताऱ्यातील स्वतःच्या घरीच ठेवले. जातीपाती हा भेद पूर्णतः नष्ट केला. संस्थेचे काम वाढू लागले आणि अनंत आर्थिक अडचणी उभ्या राहू लागल्या. अण्णांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी सुमारे ऐंशी तोळे सोन्याचे दागिने वसतिगृहात शिक्षणासाठी राहणाऱ्या मुलांच्या अन्नपाण्यासाठी मोडून टाकले. भारतीय स्त्रीला प्राणप्रिय असणारा मंगळसूत्र हा सौभाग्यालंकारही त्यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी मोडला. १९२४ ते १९२७ या तीन वर्षांत जनतेकडून अण्णांना शैक्षणिक कार्यासाठी फक्त १६३ रुपये देणगी मिळाली होती, तर खर्च सुमारे सहा हजार रुपये झाला होता. अण्णा कधीही आर्थिक संकटांना घाबरले नाहीत. उलट संकटकाळात त्यांची प्रतिभा आणखी फुलून आली.

समतेचा विचार ज्या शाहू महाराजांनी कर्मवीरांना दिला त्या शाहू महाराजांच्या नावाने साताऱ्यात अण्णांनी वसतिगृह काढले. १९२७ मध्ये महात्मा गांधीजी या वसतिगृहाला भेट दिली. '' साबरमती आश्रमात जे मी करू शकलो नाही ते कर्मवीरांनी साताऱ्यात करून दाखवले'' असे गौरवोद्गार महात्मा गांधींनी काढले होते.

अण्णांच्या मनी बहुजन समाजातील या मुलांना काटक, कणखर आणि स्वावलंबी बनविण्याचे ध्येय होते. बहुजनांचा शैक्षणिक उत्कर्ष स्वबळावर झाला पाहिजे असे अण्णा मानत. या विचारांमधूनच पुढे आली, 'कमवा आणि शिका योजना', 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे वाक्य संस्थेचे ब्रीद ठरले.

मुलांनी कष्ट घ्यावे, कोणतेही काम करावे, श्रम करताना लाजू नये, कुणापुढे हात पसरू नये अशी अण्णांची शिकवण होती. अण्णांनी कुण्या धनिकाकडे कधीही हात पसरला नाही. या उलट खेड्यापाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या खळ्यावरील मूठमूठ धान्य गोळा केले. खांद्याला नेहमी झोळी आणि हातात सोटा अशी त्यांची मूर्ती बहुजनांना आपली तारणहार वाटली. कर्तृत्व सिद्ध केल्यामुळे लोकांनी त्यांना 'कर्मवीर' म्हटले.

संस्थेने गावोगावी शाळा काढल्या. वसतिगृहे सुरू केली. रयत शिक्षण संस्थेचे पहिले महाविद्यालय सातारा येथे सुरू करताना कर्मवीरांनी रयतेच्या राजाचे, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव महाविद्यालयाला दिले.

खेडापाड्यात फिरून गोरगरिबांची मुले खांद्यावर बसून त्यांनी वसतिगृहात आणली. पोटाशी धरली. मोठी केली. कवलापूरसारख्या खेड्यातून खांद्यावर बसवून आणलेला पांडुरंग पाटील पुढे बॅरिस्टर पी. जी. पाटील या नावाने ओळखला गेला. डॉ. एन. डी. पाटील, प्राचार्य शिवाजीराव भोसले अशी कितीतरी नररत्न कर्मवीरांनी घडविली.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत कर्मवीरांचे शिक्षणप्रसाराचे कार्य सर्वोच्च ठरले. महाराष्ट्रात सामाजिक समतेची विण घट्ट झाली ती रयत शिक्षण संस्थेमुळेच. फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांना शिवरायांच्या शिवतत्त्वात बांधून रयत शिक्षण संस्थेने रयतेचे कल्याण केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत गाडगे महाराज, महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, सत्यशोधक बाळासाहेब देसाई, आचार्य अत्रे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांशी कर्मवीर अण्णांचा स्नेह होता. यावरून महाराष्ट्राच्या जडणघडणीत कर्मवीरांचे असलेले स्थान किती अढळ होते याची कल्पना येते.

आज आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षणसंस्था म्हणून रयत शिक्षण संस्था नावारूपाला आली आहे. वटवृक्षाची मुळे या महाराष्ट्राच्या मातीत खोलवर गेली आहेत.

आजच्या काळात शिक्षणाचा प्रसार झपाट्याने आणि सर्वत्र झालेला दिसतो आहे. शिक्षितांची संख्या वाढली आहे. परंतु नैतिक मूल्यांचे काय? समतेचा विचार, समर्पण वृत्ती, अतिउच्च त्याग, नैतिकता या कर्मवीरांच्या संस्कारांचा अनमोल ठेवा आपल्याजवळ आहे. हीच खरी संपत्ती आहे. हा विचार जपण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे. तेच आपले कर्तव्य आहे. त्यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन.